# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22620562/22652168 Website: http://www.dmer.org

---

क्र.संवैशिवसं/तांत्रिकपदे/जाहिरात क्र.४/फ/२००८, दिनांक :- ०८/०७/२००८

## जाहिरात

## एमईडीएसएस-सीडब्ल्यूटी-२००६

### सरळसेवेने "तांत्रिक" संवर्गातील क्ष-किरण तंत्रज्ञ व सीटी स्कॅन तंत्रज्ञ पदांवर नियुक्त्या करण्यासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षेच्या अनुषंगाने करण्यात येणा-या प्रमाणपत्रांच्या पडताळणीचा कार्यक्रम

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील संस्थांमधील "तांत्रिक" संवर्गातील सरळसेवेने नियुक्त्या करण्यासाठी दिनांक २६ नोव्हेंबर, २००६ रोजी घेण्यात आलेल्या एमईडीएसएस-सिडब्ल्यूटी-२००६ या स्पर्धा परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या अनुषंगाने क्ष-किरण तंत्रज्ञ व सीटी स्कॅन तंत्रज्ञ पदाची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी **दिनांक १८.७.२००८ रोजी सकाळी ११ वाजता** मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी उमेदवारांनी उपस्थित रहावयाचे आहे. त्याचा कार्यक्रम खालील ठिकाणी आहे.

या पूर्वी ज्या उमेदवारांना उपरोक्त पदांच्या प्रमाणपत्रे पडताळणीसाठी बोलाविण्यात आले होते, त्यांनी उपरोक्त प्रक्रियेसाठी उपस्थित रहाण्याची आवश्यकता नाही.

| परीक्षा केंद्र | प्रमाणपत्र पडताळणीचे ठिकाण |
|---|---|
| मुंबई | संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, सीएसटी स्टेशन शेजारी, मुंबई ४०० ००१ |
| पुणे | बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे |
| ओरंगाबाद | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद |
| नागपूर | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर |

(....२.......

## -: उमेदवारांना सूचना :-

उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी खालील मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत आणणे आवश्यक आहे. पडताळणी पूर्ण होताच उमेदवाराना त्यांची मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तेथेच परत करण्यात येतील. पडताळणीच्यावेळी उमेदवारांनी एमईडीएसएस-सिडब्ल्यूटी-२००६ ची माहिती पुस्तिका सोबत आणल्यास संदर्भासाठी सोईचे होईल.

१) एमईडीएसएस-सिडब्ल्यूटी-२००६ या स्पर्धा परीक्षेची गुणपत्रिका आणि प्रवेश पत्र.

२) प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने निर्गमीत केलेले राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र आणि अधिवास प्रमाणपत्र.

३) महाराष्ट्रातील संस्थेमधून दहावी आणि बारावी किंवा तत्सम इयत्ता उत्तीर्ण केल्याचे बोर्डाचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका. बोर्डाच्या दहावीच्या प्रमाणपत्रावरील नोंद असलेली जन्म तारीख वयाच्या दाखल्याकरीता ग्राहय धरण्यात येईल.

४) सर्व मागासवर्गीयांसाठी जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र(अनूसुचित जाती व अनूसुचित जमातीचे उमेदवार वगळून अन्य उमेदवारांसाठी)

५) एमईडीएसएस-सिडब्ल्यूटी-२००६ च्या माहिती पुस्तिकेत संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हतेचे (पद्वी प्रमाणपत्र/गुणपत्रिका)/ अनुभवाचे प्रमाणपत्र.

६) एमईडीएसएस-सिडब्ल्यूटी-२००६ च्या माहिती पुस्तिकेत संबंधित पदांसाठी मागणी केलेले, प्राधान्य देण्यास पात्र असलेले आवश्यक ते अनुभव / अर्हता प्रमाणपत्रे

७) मेडीकल फिटनेस प्रमाणपत्र (माहिती पुस्तिकेतील **"ॲनेक्शर - ई"** प्रमाणे)

उपरोक्त प्रक्रियेसाठी उमेदवाराने व्यक्तिशः स्वतः स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव उमेदवारा व्यतिरीक्त अन्य व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**